# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १७.०३.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १६/०३/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४४,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १६/०३/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये पोस्टे सेनगाव व कुरूंदा हददीमध्ये छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन १०.०८ लिटर दारू असा एकुण ३९२०/— रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा. पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १६/०३/२०२३ रोजी वाहतुकीस उडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ भादवि प्रमाणे एकुण २० ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**भारतीय हत्यार कायद्याअन्वये गुन्हा दाखल:—**

दि. १६/०३/२०२३ रोजी पोस्टे वसमत शहर येथे कलम ४/२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल झाला असुन यातील आरोपी हातात लोखंडी खंजीर ज्यास काळया रंगाची लाकडी मॅन असलेली व लोखंडी धारदार पाते असलेली व लोखंडी मुठ असलेली पात्याची लांबी अंदाजे १३ इंच व मुठीची लांबी ३ ईंच अशी एकुन १६ इंच लांबीचा खंजीर घेवुन सार्वजनीक रोडवर घेवुन जात असतांना मिळुन आला या संदर्भात पोलीस तपास करीत आहे.

**दुखापत :—**

दि. १६/०३/२०२३ रोजी पोस्टे गोरेगाव येथे ३ व आ.बाळापुर येथे ३ असे एकुण ६ गुन्हे कलम ३२४ व ईतर भादंवि प्रमाणे दाखल करण्यात येवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.